**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक ०२ नोव्हेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. **राज्याची सध्याची स्थिती गंभीर असून, ती बदलण्यासाठी सत्ताबदलाशिवाय पर्याय नाही-राष्ट्रवादी पक्षाचे प्रमुख शरद पवार यांचे प्रतिपादन.**
2. **आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग, रिपब्लिकन आठवले गटाचे कार्यकर्ते भाजपा वर नाराज.**
3. **नुकतेच वंचित बहुजन आघडीत गेलेले, माजी कॉंग्रेस नेते अनिस अहमद यांचा कॉंग्रेस पक्षात पुनः प्रवेश.**
4. **दिवाळी पाडवा आणि बलि प्रतिपदेचा सर्वत्र उत्साह.**

**---------------------------------------------------**

**शरद पवार**

**राज्याची सध्याची स्थिती गंभीर असून, ती बदलण्यासाठी सत्ता बदलाशिवाय पर्याय नाही. त्यामुळ राज्याला पूर्वपदावर आणण्याची ताकद असणाऱ्यांना, जनतेनं आपला कौल द्यावा आणि ती ताकद फक्त, महाविकास आघाडीत आहे असं प्रतिपादन, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष, शरद पवार यांनी केलं आहे. बारामती इथं ते पत्रकारांशी बोलत होते. राज्यात परिवर्तन आणण्याचा आणि राज्याच्या नागरिकांच्या जीवनात सुधारणा करण्याचा निर्धार आज पाडव्याच्या दिवशी करायचा आहे असं त्यांनी, सांगितलं. पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार मंडळाचा, राज्याच्या आर्थिक स्थितीबाबतचा निष्कर्ष गंभीर आहे. सत्ताधाऱ्यांनी वेळीच याकडे लक्ष न दिल्याचा, हा परिणाम आहे, असा आरोप त्यांनी केला. राज्यात जनहितासाठी राबवण्यात येत असलेल्या योजनांसाठीचा निधी सरकारनं गेल्या दोन-अडीच महिन्यांमध्ये दुसरीकडे वळवल्यानं, लाभार्थ्यांच्या हातात काहीच पडलेलं नाही अशी टीकाही त्यांनी केली. एखादा व्यक्ती गेल्यानंतर, नऊ वर्षांनी त्यांच्यासंदर्भात बोलणे चुकीचं आहे. आर.आर.पाटील स्वच्छ राजकारणी म्हणून, राज्यात नाही तर देशात प्रसिद्ध आहे. आर.आर.पाटील यांच्यासंदर्भात, असे काही घडायला नको होते. परंतु, सत्ता असली की अशा पद्धतीनं वापर केला जातो. काहीही बोलले जाते असं, शरद पवार यावेळी म्हणाले. पोलीस दलाच्या गाड्यातून रसद पोहोचवली जाते. त्या विभागातील अधिकाऱ्यांकडून ऐकायला मिळतं असा आरोप पवार यांनी या पत्रकार परिषदेत केला. दरम्यान, पुणे विमानतळावर, प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना,**

भाजप नेते आणि उपमुख्यमंत्री, देवेंद्र फडणवीस यांनी, या आरोपाचं खंडन केलं आणि पवार यांच्या काळातच, अशी रसद पुरवली जात असेल, आमच्या काळात असे प्रकार होत नाही, असं स्पष्टीकरण दिल.

---------------------------------------------------

रिपाई-आठवले

रिपाइं आठवले आणि, भारतीय जनता पार्टीची, गेल्या दहा वर्षांपासून युती आहे. तरीही रिपब्लिकन पक्षाला, महायुतीमध्ये अजिबात सन्मान मिळत नसून, लोकसभा आणि विधानसभेमध्ये, पक्षाला एकही जागा मिळाली नाही. नुकत्याच, ३०-३२ महामंडळाचे अध्यक्ष आणि सदस्य पदांच्या, निवडणूका जाहीर झाल्यात, त्यात पक्षाला स्थान नाही. तर, विधानपरिषदेवर, राज्यपाल नियुक्त सात सदस्यांच्या नियुक्त्या झाल्यात आणि, पाच जागा रिक्त ठेवण्यात आल्या, पण रिपाइंचा विचार केला गेला नाही असं रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे राष्ट्रीय संघटन सचिव भूपेश थुलकर यांनी आज नागपूर सांगितलं. विदर्भातील आणि महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांमध्ये, आणि आंबेडकरी -रिपब्लिकन जनतेमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर, रिपाइं आठवलेच्या, विदर्भातील कार्यकर्त्यांनी, "आम्ही आठवले यांच्या रिपब्लिकन पक्षासोबत आहोत पण, या निवडणुकीमध्ये भाजपा सोबत राहणार नाही", अशी, आक्रमक भूमिका घेतली आहे. याबाबत परिस्थितीची माहिती देणारे पत्र भूपेश थुलकर यांनी, पक्षाध्यक्ष रामदास आठवले यांना पाठविलं असून, सकारात्मक भूमिका घेऊन, विदर्भात कार्यकर्त्यांना मोकळीक द्यावी अशी विनंती केली आहे.

---------------------------------------------------

प्रचार तोफा

विधानसभा निवडणुकीतील उमेदवारांना, अर्ज माघारी घेण्याची मुदत, चार नोव्हेंबरला संपणार असून त्यानंतर दोनच दिवसांनी विविध पक्षांच्या प्रचाराच्या तोफा धडाडणार आहेत. महाविकास आघाडीच्या प्रचाराला, सहा नोव्हेंबर रोजी सुरुवात होणार आहे. मुंबईतील बी.के.सी. मैदानावर, सहा तारखेला महाविकास आघाडीची सभा होणार असून, या सभेला, लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस नेते, राहुल गांधी, राष्ट्रवादी कॉंग्रेस अध्यक्ष, शरद पवार आणि उद्धव ठाकरे उपस्थित राहणार आहेत. तर दुसरीकडे महायुतीच्या प्रचाराचा प्रारंभ आठ तारखेला होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आठ नोव्हेंबरला, महाराष्ट्रात येणार आहेत. महायुतीकडून पंतप्रधान नरेंद्र मोदी आठ सभा, या विधानसभा निवडणुकीत घेणार आहेत.

---------------------------------------------------

**आढावा विधानसभा मतदारसंघांचा**

**श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम, दररोज सायंकाळी सात वाजून १० मिनिटांनी, अस्मिता वाहिनीसह, प्रादेशिक वृत्त विभागाच्या,** Youtube **वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज, हिंगोली आणि परभणी जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.**

---

**अनिस अहमद**

**नागपूर मधून, पाच वेळा विधानसभा निवडणूक लढवलेले, अनिस अहमद यांनी आज, काँग्रेस पक्षात पुन्हा प्रवेश केला. काही दिवसांपूर्वी, अनिस अहमद यांनी, वंचित बहुजन आघाडी या पक्षात प्रवेश केला होता. या पक्षाकडून ते, मध्य-नागपूर मतदारसंघातून निवडणूक लढवणार होते, परंतु निवडणुकीचा अर्ज भरण्यास, त्यांना विलंब झाल्यानं, अर्ज दाखल करता आला नाही. परंतु आज अहमद यांनी, मुंबईत काँग्रेस कार्यालयात जाऊन, काँग्रेसचे प्रभारी, रमेश चेन्नीथला यांच्या उपस्थितीत, काँग्रेसमध्ये प्रवेश केला.**

---

**दिवाळी बलिप्रतिपदा**

**आज कार्तिक शुद्ध प्रतिपदा, म्हणजेच बलिप्रतिपदा किंवा दिवाळी पाडवा. हा दिवस साडेतीन शुभ मुहूर्तांपैकी एक मानला जातो. त्यामुळ चांगल्या उपक्रमांची सुरुवात किंवा महत्त्वाची खरेदी आज केली जाते. घर, वाहन किंवा सोने खरेदीसाठी आजचा मुहूर्त साधण्याचा साधारण कल आहे. भेटवस्तू, तसंच मोबाईल फोन्स, आणि इलेक्ट्रॉनिक वस्तूंची खरेदीही, मोठ्या प्रमाणात होत आहे. मोठी दुकानं, मॉल्स, घाऊक बाजारपेठा, सराफकट्टे गजबजले आहेत. अनेकांनी ऑनलाईन खरेदीला पसंती दिली असून, देशाच्या अनेक भागात हा नववर्षाचा प्रारंभ मानला जातो. गुजराती नववर्षानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावर गुजराती भाषेत शुभेच्छा संदेश दिला आहे. हे नवीन वर्ष सर्वांसाठी आनंद, सफलता, आरोग्य आणि समृद्धी घेऊन येवो, अशी कामना त्यांनी व्यक्त केली आहे. महाराष्ट्रात आगामी विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं, विविध राजकीय पक्ष या सणाचं औचित्य साधून, अधिकाधिक मतदारांपर्यंत पोचण्याचा प्रयत्न करत आहेत. आज देशभरात गोवर्धन पूजा साजरी होत आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी, गोवर्धन पूजेनिमित्त देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. लक्ष्मी पूजनाच्या दुसऱ्या दिवशी, गोवर्धन पूजा साजरी करण्याची परंपरा असून, भगवान कृष्णांनी, गोवर्धन पर्वताद्वारे संपूर्ण जगाचं**

रक्षण केलं, भगवान श्रीकृष्णाचा आशीर्वाद सर्वांना मिळो असं, त्यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

---

'आमची दिवाळी वंचितांसाठी'

गोंदिया जिल्ह्यातील, देवरी तालुक्यातील, दीनबंधू ग्रामीण विकास संस्था आणि, सुवर्ण प्राशन फाउंडेशन, यांच्या संयुक्त विद्यमानं, मागील चार वर्षापासून, 'आमची दिवाळी वंचितांसाठी' हा उपक्रम राबविण्यात येत असून, यावर्षी, सालेकसा तालुक्याच्या अति संवेदनशील पत्राटोला गावाची निवड करण्यात आली. याठिकाणी, ३७ घरांची लोकवस्ती असलेल्या, पत्राटोला गावातील लोकांना, दिवाळीचे फरसाण, नवीन कपडे, लहान मुलाना, शैक्षणिक साहित्य वितरित करण्यात आलं.

---

"मतदान निश्चय शपथ"

निवडणूक हा लोकशाहीचा सर्वात मोठा उत्सव असून, यात प्रत्येक व्यक्तीला मतदानाचा अधिकार आहे. मतदान हे प्रत्येकाचं कर्तव्य देखील आहे, याची जाणीव करून देणारी, "मतदान निश्चय शपथ" नागपूर मनपा मुख्यालय आणि मनपाच्या दहाही झोन कार्यालयात, नुकतीच घेण्यात आली. सिस्टेमेटिक व्होटर्स एज्यूकेशन अँड इलेक्ट्रॉल पार्टीसिपेशन अर्थात 'स्वीप' कार्यक्रमांतर्गत, नागपूर महानगरपालिका मुख्यालयात आयोजित कार्यक्रमात उपायुक्त, विजय देशमुख यांच्यासह अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. मतदानाची टक्केवारी वाढावी म्हणून, वाशीम जिल्हा परिषद, विद्यालय कामरगाव इथं, शिक्षक गोपाल खाडे यांनी, आपल्या निवासस्थानी, आकाश कंदीलाच्या माध्यमातून, मतदानाची टक्केवारी वाढवण्याचा संदेश दिला आहे. वाशीम जिल्ह्याच्या, जिल्हा निवडणूक अधिकारी तथा, जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांनी, मतदान टक्केवारी वाढीवर भर दिला आहे.

---

शेतकरी प्रशिक्षण

केंद्रीय कृषि मंत्रालय आणि वस्त्रोद्योग, मंत्रालयाच्या सहाय्यानं, देशातील कापूस उत्पादन वाढीसाठी, कापूस विशेष प्रकल्प, महाराष्ट्रामध्ये, केंद्रीय कापूस संशोधन संस्था, अर्थात सी.आय.सी.आर. नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली, राबविली जात आहे. महाराष्ट्रातील वर्धा, नागपूर, यवतमाळ या तीन जिल्ह्यामध्ये, हा विशेष प्रकल्प राबविल्या जात आहे. वर्धा जिल्ह्यात ४११, नागपूर जिल्ह्यात ४९० आणि यवतमाळ जिल्ह्यात, साठ हेक्टर क्षेत्रात, कापूस विशेष प्रकल्पाचे, नियोजन करण्यात आलं आहे. या अनुषंगानं, कॉन्फेडरेशन ऑफ इंडीयन टेक्स्टाइल इंडस्ट्रीज,

कॉटन डेव्हलपमेंट अँड रिसर्च असोसिएशन, मुंबईद्वारे, नुकत्याच झालेल्या, तीस ऑक्टोंबर रोजी, केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर इथ, कापूस विशेष प्रकल्प कार्यशाळा आणि शेतकरी प्रशिक्षणाचं आयोजन संपन्न झालं.

---------------------------------------------------

स्ट्रॉंग रूमला भेट

निवडणूक निरीक्षक पोलीस, केथन आर. यांनी, वर्धा जिल्हयातील आर्वी विधानसभे अंतर्गत, प्रशासकीय इमारत आर्वी इथल्या ई.व्ही.एम. स्ट्रॉंग रूमला भेट देऊन पाहणी केली. तसंच, खडका चेक पोस्ट इथं भेट देऊन, पथकांना सूचना दिल्या. विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-2024 करिता, वर्धा लोकसभा मतदार संघातील, देवळी, आर्वी, हिंगणघाट आणि वर्धा विधानसभा मतदार संघाकरिता, निवडणूक निरीक्षक पोलीस म्हणुन, त्यांची निवडणूक आयोगानं नियुक्ती केलेली आहे. निवडणूक आचारसंहिता, कायदा आणि सुव्यवस्था, रोख आणि भेटवस्तू वाटप या अनुषंगानं, ते चारही विधानसभा मतदार संघातील कामकाजाचा आढावा घेत आहेत.

---------------------------------------------------

अनिल कौशिक

नवी मुंबई महापालिकेचे, माजी उप-महापौर आणि काँग्रेस जिल्हाध्यक्ष, अनिल कौशिक यांनी आज, भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या, सागर या निवासस्थानी, हा पक्षप्रवेश झाला. यावेळी मंत्री रवींद्र चव्हाण, आमदार निरंजन डावखरे आदी उपस्थित होते. फडणवीसांच्या उपस्थितीत, अनिल कौशिक यांनी केलेल्या पक्ष प्रवेशामुळ विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर नवी मुंबईतील काँग्रेसला खिंडार पडले आहे.

---------------------------------------------------

जादा रेल्वे

दिवाळीच्या सुटीमध्ये देशभरात, वेगवेगळ्या ठिकाणी, आपल्या मूळ गावी जाण्याकडे नागरिकांचा कल असतो. त्यामुळेच, रेल्वेनं, नागरिकांच्या सुविधेसाठी यंदाच्या दिवाळीत, साडेसात हजार जादा रेल्वे सोडल्या आहेत असं, रेल्वेकडून कळविण्यात आलं आहे. आज पाडव्याच्या दिवशीच, रेल्वेनं, प्रवाशांसाठी १६८ जादा रेल्वे सोडल्या आहेत.

---------------------------------------------------